## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, शुक्रवार, ता. १६ माहे जुलै, सन २०१० (अंक ९७२


*संपादकीय*

## पत्रम्

-सुहासिनी कीर्तिकर

रसिकहो, परवाच 'बकुळफुलं' वाचत होते. संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांचं. त्यातल्या एका लेखात 'व्हॅलेन्टाइन डे'बद्दलचे तिचे अनुभव तिनं वाचकांबरोबर 'शेअर' केलेत. तिनं काय करावं या दिवशी? नवऱ्याला एक छानसं पत्रच लिहीलं तिनं. त्या लेखात ती म्हणते, 'मला ईमेल नसता का करता आला?' किंवा मग 'एसेमेस' तरी पाठवता आला असता नं?' ऑफिसला गेलेल्या नवऱ्याला क्षणात हिच्या भावना पोचल्या असत्या. पण नाही. नवरा घरी येणार. मग गप्पा करता करता किंवा मुलीच्या अभ्यासाकडं पहाता पहाता त्याला अचानक त्याच्या नावाचं पत्र दिसणार. अरेच्चा! कुणाचं पत्र? तर घरातल्या घरातच चोवीस तास भेटणाऱ्या बायकोचं! केव्हढं रोमांचकारी! पत्राचा हा आनंद एसेमेस, ईमेलमध्ये नाही. हस्ताक्षर, त्यातील भावना जेवढ्या आपुलकीनं पत्र 'या हृदयीचे त्या हृदयी' पोहोचवतं तेवढ्या ताकदीनं इतर माध्यमं नाहीतच. मग ती पत्रं काहींची काहींना कोरी का पाठवलेली असेनात. लग्नापूर्वी सुनीताबाईंची 'पु. लं.'ना अशीच फक्त सही असलेली कोरी पत्रं जायची. कधी त्यावर अगदी 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' असेही असायचे. कोऱ्या कागदावर 'कोरा कागज' असलेल्या मनाला कल्पनेनं काय काय आणि किती किती वाचता येत असेल नं? एकमेकांची मनं तर निश्चितच वाचता येत असतील. असतील नव्हे; वाचता येतातच. म्हणूनच आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगातही इवलीशी पत्रं फार मोठी कामगिरी करतात.

डॉ. हौदानी नावाचा एक जगप्रसिद्ध जादूगार होऊन गेला. त्याच्या जादूविषयी नकोच बोलायला. पण इथं तो आठवायचं कारण म्हणजे त्यानं घरातल्या घरात आपल्या बायकोला असंख्य पत्रं लिहीली. मात्र पोस्टात टाकली नाहीत. तिला ताबडतोब दिलीही नाहीत. ती त्यानं कुठं कुठं अशी लपवून ठेवली. तो गेल्यावर त्याच्यामागे त्याच्या बायकोला ती अधूनमधून सापडत राहिली. कधी पिठाच्या डब्यात, कधी आवारात. कधी त्याच्या एखाद्या पुस्तकात, कधी त्याच्या पासबुकात. जणू काही तो जीवंतच होता. अनपेक्षितपणे विजेरीच्या प्रकाशात काळोख उजळून जावा तसं त्याच्या मृत्यूच्या गडद दु:खात त्याची पत्रे तिच्याशी संवाद साधत राहिली. तिच्या मनाच्या गाभाऱ्यात 'पुष्पम्, फलम् तोयम्' मागची अर्पित वृत्तीची भावना या पत्रांनी आकारत राहिली. तो गेला तरी पत्रांतून त्याचे प्रेम व्यक्त होत राहिले. ही असते पत्रांची जादू. जे उच्चारायला संकोच वाटतो, ते लेखणी मुक्तपणे बोलत रहाते.

एक आनंदाचं पत्र आलं की आपल्या आनंदाला उधाण येते. एक सांत्वनाचं पत्र आलं की आपल्या दु:खावर फुंकर मारली जाते. प्रभुराम जोशी गेले तेव्हा आलेल्या सांत्वनपर पत्रांचं मृदुला जोशींनी (पूर्वाश्रमीच्या मृदुला आगासकर) पुस्तकच तयार केलं. स्मृतिचिन्ह उभारावं तसं हे पुस्तक. एक दिलगिरीचं पत्र आलं की मनामनांमधला दुरावा मिटून जातो, अबोला विरघळतो. पत्राची अशी महती काय वर्णावी? माणुसकीचा, मैत्रीचा अखंड झरा त्यातून वहात

(पान २, कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Happy Times

-Vaijayanti Kirtikar

**Angels can fly because they take themselves lightly….**

I am happy, the world around me is also very happy and we are all living in an era of happy times. Sounds crazy? So much happiness sounds unreal? Well, all the things happening around us are so hilarious in all their serious issues that one cannot help but smile and be happy. All students who have cleared the 10th standard examination are still in a lurch waiting for the verdict, while the state government tries to salvage its pride knocking on the doors of the Supreme Court. I was speaking to a friend's daughter who is also waiting for the admission process to start. Now while her mom is fretting and sweating over this issue day and night, the daughter couldn't care less. It is only extended vacation time for her to be utilized to the maximum. An advice to parents of wards who are going to give the important examination in future - expect the unexpected. Be prepared for delays and long waits, keep celebrations in wraps till you are absolutely sure that the percentage is not going to change again and make the best of the extended vacation your child gets unexpectedly, coz the government has misunderstood this chaos as a yearly ritual and follows it religiously. And in the mean time don't forget to be happy. Laugh out loud; after all it is a funny ritual.

Talking of funny rituals, our newspapers are not to be left behind. We were splashed with news of the suicide of a certain model, majority of us hadn't even heard of her. But for many days minute details about her were provided to us, courtesy front page of leading dailies. Also everyday along with the feature based on her, there used to be huge picture of her. Good looking indeed, pleasing to the eyes definitely, but the facts stated were disturbing. Did this news really need the importance that was given to it? How come none of the farmer suicides featured with such prominence, forget photographs, even their names were not deemed important to be printed, while the model's cats also found themselves on the front page. With due respect to the dead, I am sure even she must be wishing she could have garnered such fame when she was alive rather than when she is dead. Speaking of front page news, our men in blue have always found prominent place to a nation which follows the religion of cricket. So it is not surprising to see M S Dhoni's marriage making front page news. But what is appalling is that at the same time Leander Paes who won another Mixed Doubles title at Wimbledon found only a few words on the same page. While Saina Nehwal makes news only for a day or two after winning 3 titles in a row and getting a world ranking of no. 3, Sania Mirza with her eye candy looks makes up for huge news pieces with every wrong or right move in her professional and personal life. So what's the big deal? We get to see photographs of good looking people. Why should we complain? Lets just smile and continue being happy.

It is quite another aspect that this happiness is being marred by the ever increasing costs of essential commodities. Time to

(Cont. on Page 2 col.3)

(पान१, कॉलम २ वरून)

असतो. मनामनांची नाती त्यातून वेध घेत घट्ट बांधली जातात. नवे बंध तयार होतात.

मित्रहो, 'प्रभुतरुण'चा जूनचा अंक तुम्ही पाहिलाच. त्यात प्रतिक्रियाच प्रतिक्रिया भरभरून आल्या आहेत. इतक्या की त्यासाठी आम्हाला दोन पानं वाढवावी लागली. तरीही 'दशांगुळे पुरून' उराव्यात तशा या प्रतिक्रियांना ही वाढीव पाने अपुरीच पडली. याही आधी आलेली वाचकांची पत्रेही त्यामुळं मागं ठेवावी लागली. या प्रतिक्रियांनी, या पत्रांनी खरंच सांगते, तुम्हा आम्हांत नव्याने 'नवा बंध' तयार झालाय. प्रभुतरुण, त्याचा युवमंच याबद्दल तुम्हा वाचकांचे, रसिकांचे, पाठीराख्यांचे किती प्रेम आहे; ते कसं वाढतं आहे; याची प्रचिती या पत्रांतून, प्रतिक्रियांतून येत गेली मला. वाचकहो, प्रतिक्रियांचं 'दान पावलं!' त्यामुळे आपल्या सर्वांच्या अशाच प्रतिक्रिया अखंड येत रहाव्यात म्हणून नवनवीन कार्यक्रम, उपक्रम करण्याचं बळ आणखी वाढलं आमचं. तेव्हा या अग्रलेखातून माझ्या भावना व्यक्त करत तुम्हा रसिकांना मी हे जाहीर पत्रच लिहीतेय् असं समजा. वरचेवर पत्र, प्रतिक्रिया पाठवत चला. मी या प्रतिक्रियांबद्दल कृतज्ञ आहे. कृतज्ञ राहीन.

लोभ आहेच. वृद्धींगत व्हावा.

कळावे,

आपली,

सुहासिनी कीर्तिकर

**ता.क.**-हळुहळू परीक्षांचे सगळे निकाल हाती येत आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन. आनंदाची बाब अशी की हे अनेक विद्यार्थी आपल्या 'प्रत्युश'चे कलाकार आहेत. या पत्रातून त्यांना खास शाबासकीची थाप! **-सुहासिनी**

---

(Cont. from Page 1 col.4)

worry? No ways, our politicians make sure that we at least enjoy the icing on the cake, if not the entire cake. Keep us hungry, but give us a fake satisfaction of eating the icing. So we see the nation responding to the Bandh on 5th July. Now if we could just set aside the woes of those who suffered due to this Bandh, the Bandh proved to be just the ideal cause to give us the much desired extended weekend. While prices still continue to spiral and while many suffered losses due to the stir, majority of us simply rejoiced. As I said happy times are here.

To add to the happiness, Paul the Oracle Octopus also decided to have some fun and enjoy its moments of fame. Now if this different species can also have fun, why should we humans be left behind? The football World Cup gave us just one more chance for a month of celebrations, late nights and sleepy office hours. To add to this entire happy atmosphere, the rains too made their essential contribution. Now only the completely lost soul can manage to keep a long face in the rains. Rains bring joy to one and all. I happened to read a quote online by an unknown author. It read 'Happiness is thinking you forgot your umbrella, then spotting it in your backpack and walking through the pouring rain dry.' But what caught my attention was the comment left by someone in response to this quote. It read 'happiness is having an umbrella in your backpack but walking without it through the pouring rain anyway.'

Rightly said the perspective of happiness changes from person to person. While the things that bring happiness may differ for every individual, one thing is common, happiness not only feels good, but it is also good for every living being. Research has proved that happy people enjoy better health as they are more likely to have stronger immune systems. This automatically leads to a longer life. Also happiness is the key to successful relationships. Happier people are more satisfied with their jobs than less happy people and this results in higher productivity. Studies indicate happier people have less depression, less suicide tendencies, and less paranoia than unhappy people, as well as greater self control and coping skills. With so many benefits, don't you think happiness is worth giving a try?

Now if you are still unlucky enough to not find a reason to smile and be happy, I'll help you cheat. Go watch the movie 'Raavan'. You are sure to be found rolling with laughter watching the movie.

As for me, my happiness quotient is at an all time high these days. After all the monsoon is the season of hope for me. So every night I sleep with only one dream in mind and one song on my lips 'सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल का? ऑॉफिसभोवती तळे साचून सुट्टी मिळेल का?'

**The time to be happy is now. The place to be happy is here. The way to be happy is to make others so.**

---

## प्रतिक्रिया

एप्रिल महिन्यातील प्रभुतरुणाचा संपूर्ण अंक वाचनीय वाटला. श्री. सुहासिनी कीर्तिकरांची त्यांच्या साहित्यिक व्यासंगामुळे कै. विंदांना आदरयुक्त श्रद्धांजली. बाजूलाच सौ. संजना कोठारे यांचा खुद्द प्रभुतरुणाच्याच विस्मरणात गेलेल्या प्रभुतरुणचे आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध. हे कार्य कोणीतरी या आधीच करावयास हवे होते. पण अखेर त्यांच्या नातसूनेवरच, जिने त्यांना कदाचित पाहिलेपण नसेल; तिच्यावरच ही पाळी आली. आणि कौतुकाने म्हणावे लागेल की संजनाने त्यांची unbiased ओळख नवीन पिढीला व आमच्या पिढीच्या आठवणीना उजाळा देत करून दिली. कै. विष्णु कृष्ण यांच्या निवृत्तीला ४० वर्षे झाल्याचा मुहूर्त साधला गेला आहे.

त्यावेळी प्रभुतरुणाची एकंदरच विचारधारा एकांगी होती. नेहमी टोकाचीच भूमिका असे. कदाचित त्यांच्या सल्लागार मंडळाचा तसा आग्रह असेल. त्यांचे विचार आमच्यासारख्या तरुण मंडळींना न रुचण्यासारखे होते. त्यांच्या लिखाणामुळे ज्ञातीत जवळजवळ दोन पक्ष होते. प्रभातपक्ष, तरुणपक्ष एका बाजूस रामराव विजयकर, आर. एस. तळपदे, आर. एम. तळपदे, एम. व्ही. एस. कोठारे, माधव नायकसारखी तरुण पिढीला प्रोत्साहन देणारी माणके होती तर विरोधी पक्षातून तरुणांची हेटाळणी होत असे. काळाची पावले न ओळखता मिश्र विवाहितासंबंधी नेहमी हेटाळणीच्या स्वरूपाचे लिखाण असे. तरीपण गृहस्थ सतत ३०-३५ वर्षे दर महिन्याच्या १६ तारखेला अंक प्रसिद्ध करतो याचे मला with all the faul कौतुक वाटे. प्रत्येक अंकातील 'काही इकडे तिकडे' या सदराची वाचक उत्कंठतेने वाट पाहत असत. सतत ४० वर्षे संपादकपदाची धुरा खांद्यावर वाहिल्यानंतर त्यांनी आपले चिरंजीव श्री. सुहासच्या अंगावर संपादकपदाची वस्त्रे चढविली. आणि विशेष म्हणजे शेवटपर्यंत त्यांनी प्रभुतरुणच्या कार्यात/लिखाणात ढवळाढवळ केली नाही. कै. सुहासच्या माणसे जोडण्याच्या स्वभावामुळे तरुणाच्या विचारसरणीत आमूलाग्र बदल झाला. संगीत, नाटक या आवडीमुळे काही गायक व कलावंतावरील त्यांचे लेख वाचनीय असत. त्याच्याच कारकिर्दीत प्रमोद व सुहासमधील मैत्रीमुळे दोन्ही ज्ञातीमासिकांच्या परस्परावरील परिमाणच बदलले. प्रभात बोर्डाच्या सदस्याच्याही मजकूराला तरुणात प्रसिद्धी मिळू लागली. दोन्ही वृत्तपत्रे आपापल्या वेगवेगळ्या स्वरूपात ज्ञातीहिताचे कार्य करू लागली.

श्री. नंदकुमार विजयकरांच्या 'एक गैरसमज' या लेखावर बरेच काही लिहीता येईल.

सौ. बागेश्री पारीख 'धुरंधर' यांची लेखमाला नेहमीच वाचनीय व ज्ञानात भर टाकणारी असते.

शेवटी सौ. संजनाला हा लेख लिहिण्यास प्रोत्साहन देणारे तिचे कुटुंबीय अनील रावांच्यासहीत यांचे अभिनंदन.

एक सूचना-दरवर्षी कै. विष्णु कृष्ण कोठारेंच्या पुण्यतिथी महिन्यात या आद्य संपादकांचा फोटो छापावा. त्याचप्रमाणे कै. सुहास, कै. विहंग यांच्या पुण्यतिथी महिन्यात त्यांच्या फोटोखाली दोन ओळीतरी लिहाव्या.

**-सुमंत तळपदे**

(कै. विहंग यांच्या दोन्ही स्मरणमासांत त्यांच्यावर मी स्वतंत्र लेखच लिहीले आहेत. दोन ओळी स्वतंत्रपणे लिहीण्यापेक्षा 'प्रभुतरुण' अधिकाधिक संपन्न करून त्यांचे काय करावे; असे मला वाटते. संपूर्ण अंकच दरवेळी वाचनीय असतो; नाही का? -संपादक)

❑❑❑

एप्रिलच्या अंकातील नंदकुमार विजयकरांचा '...एक समज' वाचला. प्रताप वेलकरांना साथ देणारे ज्ञातीबांधव असल्याचे पाहून बरे वाटले. ज्ञाती बांधवांना योग्य ते मानाचे स्थान मिळावे म्हणून वेलकरांची नेहमी धडपड असते. पण परभांचा 'मराठी बाणा' आड येतो व त्यांच्या प्रयत्नांकडे कानाडोळा केला जातो. परंतु येथे तर विजयकरांनी संपूर्ण जातीलाच कमी लेखल्याचे नजरेस आणले आहे.

येथे एक गोष्ट आपल्या लक्षात येणे जरूरीचे आहे की तिन्ही तीन घटनांमध्ये परभांना कमी लेखणारे इतर (आडू) जातीचेच असणार. मग त्यांच्याकडून दुसरी काय अपेक्षा बाळगायची? तसे आपणदेखील भटांच्या पाणीढोळ वरणाची थट्टा करतोच की. मराठा (घाटी), सोनार इत्यादी ज्ञातीशी सोयरीक करायला करचतोच ना? भंडारी, आगरी ह्याचा मद्यपानाशी घनिष्ट संबंध असल्याने त्यांच्याशी विशेष संबंध ठेवत नाहीच मग इतरांनी आपल्याला कमी लेखल्याचे दु:ख का करा?

उपराष्ट्रपती व राष्ट्रपती असतानादेखील श्री. सर्वपल्ली राधाकृष्ण सारखी विद्वान व्यक्ती श्री. एम. आर. (बाबासाहेब) जयकरांना भेटायला पुण्याला वेळात वेळ काढून जात असे. पण स्वत:ला उच्च स्थरांचे म्हणवून घेणाऱ्या देशस्थ/कोकण-स्थांनी ह्या पुणे विश्वविद्यालयाला आपले सर्वस्व बहाल करणाऱ्या महानुभावाला कितीसा मान दिला? नव्हे आपणही त्यांच्यासाठी किती आदर बाळगलाय?

निव्वल संख्याबळ असल्याने स्वत:चे घोडे दामटवायचा धंदा जात/पोट जात करतेय वरच्या थरांचे मानूनही मराठ्यांची आरक्षणासाठी धडपड चालूच आहे की. म्हणजेच स्वत:ला मागासलेले म्हणून घ्यायला पुढेमागे बघत नाहीतही लोक. निदान पाठारेप्रभु एवढ्या खालच्या थराला आजपर्यंत तरी उतरलेला नाही.

परभी राहणीमान, भाऊरसूल बाबत पुरवणीत लेख देऊन 'लोकसत्ता'-सारख्या दैनिकांना ग्लोबलाईज करण्याचा विडा उचलेला दिसतोय. तेव्हा 'परभी तारा उगवतोय, खरा माझ्या सरकारा, खुशाल कोंबडं झाकून धरा. खुशाल कोंबडं!

**-उदय बा. जयकर**

किस्से कोर्टातले-

# अनुत्तरीत प्रश्न

-सौ. बागेश्री योगेन परीख

फॅमिली कोर्टात जेव्हा मुलांचा ताबा किंवा Visitation Rights मागायचे असतात तेव्हा बहुतेक केसेस Guadians & wards Act 1890 ( जो सर्व धर्मीयांसाठी आहे) किंवा हिंदुसाठी Hindu Minoritry And Guardianship Act 1956 ह्या कायद्याखाली खटला दाखल करावा लागतो. ह्या दोन कायद्यांखेरीज सर्व धर्मांच्या वैवाहिक दाव्यांमध्येसुद्धा मुलांचा ताबा मागण्याची तरतूद आहे.

ज्या पालकाकडे मुलाचा ताबा आहे त्याला Custodial Parent म्हटलं जाते. non custodial parent ला प्रथम जर मुलाला भेटायची इच्छा असेल तर प्रथम मुलाचा ताबा मागण्याची केस करून अंतरीम स्टेजला मुलाला भेटण्याचा अर्ज करता येतो.

मुलाचे आईवडील हे natural guardian म्हणून संबोधले जातात. आईवडीलांखेरीज इतर नातेवाईकांना म्हणजे आजी-आजोबांनासुद्धा नातवाला भेटण्याची तरतूद कायद्यात नाही. परंतु मुलाचे आई किंवा वडील दिवंगत झाले असल्यास, आजी-आजोबांना भेट घडवून आणण्याची तरतूद मानवतेच्या दृष्टीकोनातून केली जाते.

शिवरामन ह्या दाक्षिणात्य माणसाने त्याचा नातू भरत वय वर्षे ४, ह्याचा ताबा मिळावा म्हणून केस केली होती. शिवरामन अंदाजे ७२,७३ वयाचे होते. त्यांची पत्नी लक्ष्मी सत्तरची असावी. त्यांचा मोठा मुलगा अरुण, लग्नानंतर त्याची पत्नी रेखासोबत शिवरामन बरोबर राहत होता व व नोकरी करीत होता. अरुणला एक बहीणपण होती. छोट्या भरतच्या जन्मानंतरसुद्धा ती सर्व मंडळी दाटीवाटीने एकत्रच राहत होती. त्यांचं घर अंधेरीला होतं.

आणि अचानक एके दिवशी अरुण बी. ए. आर. सी.तून स्कूटरवरून घरी येत असताना त्याला अपघात झाला. वैद्यकीय मदत मिळण्याआधीच अरुणचा दु:खद अंत झाला. सबंध कुटुंबावर शोककळाच पसरली. छोटा भरत तर तेव्हा फक्त ३ महिन्याचा होता.

शिवरामन रिझर्व्ह बँकमधून रिटायर झालेले होते. त्यांना पेन्शन, फंड व सेव्हिंग असल्याने ते त्यांचा व लक्ष्मीचा खर्च करण्यास समर्थ होते. मुलीचं लग्न सधन कुटुंबात झालं होतं. शिवरामनची थोडी प्रॉप्रटी गावीसुद्धा होती.

रेखा बारावीपर्यंत शिकलेली होती. तिला अरुणच्या जागी बी. ए. आर. सी.मध्ये नोकरी मिळाली. लक्ष्मीने रेखाला खूप सांभाळून घेतलं. भरत त्यांचा एकमेव वारस होता. त्यामुळे त्यालाही सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण रेखाच खूप बेजबाबदारपणे वागली. आजीआजोबांचा लळा लागू नये म्हणून ती भरतला creche मध्ये ठेवायची व नोकरीला जायची. आणि एक दिवस रेखाने खूप भांडण करून घर सोडलं व भरतला घेऊन ती तिच्या माहेरी माटुंग्याला राहायला निघून गेली.

शिवरामनचं म्हणणं होतं की रेखाने त्यांच्याशी पूर्ण संबंध तोडले. त्यांनी भरतला भेटण्याचे जुजबी प्रयत्न केले व रेखाने त्यांना भेटू दिलं नाही.

कालांतराने रेखानी तिच्याच ऑफिसमध्ये काम करणाऱ्या प्रभाकरनशी विवाह केला व स्वत:चा संसार थाटला. आता तर तिला दुसरा मुलगापण झाला होता.

भरत आता चार वर्षाचा झाला होता. लक्ष्मीची तब्येत चांगली राहत नव्हती. भरत त्यांचा एकमेव वारस होता. अशा परिस्थितीत शिवरामनला भरतचा ताबा किंवा निदान त्याची भेट हवी होती आणि त्यासाठीच त्यांनी ही कैफीयत दाखल केली होती.

वरवर पाहता केस तशी सोपी वाटत होती. रेखा ताबा देणार नाही, पण भेटायला देईल असं वरपांगी वाटत होतं. पण माझा कयास चुकला होता.

रेखाला Summon's मिळाल्या-क्षणीच ती कोर्टात हजर झाली. सावळा रंग, सरळ नाक, लांब केस, दाक्षिणात्य लूकस्, पण डोळे खूप बोलके. पाहताक्षणीच मला जाणवलं की, ह्या मुलीनं खूप काही भोगलं असावं. आतापर्यंत मी बरीचशी व्यक्तिमत्त्व अगदी जवळून पाहत आल्याने त्यांच्या मनातली खळबळ मला स्पष्ट दिसू शकत होती.

रेखाने वकिलाच्या मदतीने रिप्लाय फाईल केला होता. पण तिच्यासी व्यक्तिश: बोलावं असं मला वाटत होतं.

रेखा थोडसं मराठीपण बोलू शकत होती. ती म्हणाली की, माझं अरुणशी अ‍ॅरेंज मॅरेज झालं होते. माझे सासरे खूप कडक होते. सुरुवातीपासूनच आम्हाला दोघांनाही त्यांनी व सासूबाईंनी धाकात ठेवलं होतं. अरुण असतानासुद्धा तिला ते छळायचे. एका वर्षात अरुण गेला त्यानंतर तिच्या दु:खाला अंतच नव्हता. तुझ्यामुळेच आमचा मुलगा गेला असं म्हणून रेखाला रोजच शिवरामन व लक्ष्मी त्रास द्यायचे. छोट्या भरतचापण दुस्वास करायचे. रेखानी नोकरी करू नये असं त्याचं मत होते. पण रेखाने त्यांच्या मनाविरुद्ध बी.ए.आर.सी.चा प्रस्ताव स्वीकारला होता. अरुणच्या निधनानंतरचे compensetion आणि Dues आम्हाला दिलेस तरच आम्ही तुला नोकरी करू देऊ असं ठामपणे तिला सांगण्यात आलं व त्यालाही रेखा तयार झाली. कारण तिला स्वत:च्या पायावर उभं राहायचं होतं व छोट्या भरतला मोठं करायचं होतं तिच्या गैरहजेरीत भरतला सांभाळायला जेव्हा लक्ष्मीनी नकार दिला तेव्हा त्याला creche मध्ये ठेवण्याशिवाय रेखाला गत्यंतर नव्हतं. भरतच्या दूध पिण्यावरूनसुद्धा जेव्हा रेखाला ऐकून घ्यावं लागलं तेव्हा तिने घर सोडण्याचा निर्धार केला.

रेखाची माहेरची स्थिती फारशी चांगली नव्हती. पण रेखाची व भरतची कीव येऊन तिच्या आईवडिलांनी रेखाला आसरा दिला. रेखा खूप मेहनती होती. बीएआरसीमध्ये तिने खूप स्नेही जोडले होते. आणि एक दिवस प्रभाकरन तिच्या आयुष्यात आला. तो अविवाहित होता. तिच्याच कम्युनिटीचा तिचीच भाषा बोलणारा तामीलीयन होता. त्याचे आईवडील चेन्नईला होते व तो मुंबईत एकटाच राहत होता. प्रभाकरननी रेखाचा व भरतचा आनंदाने स्वीकार केला होता.

रेखाने आपल्या लग्नाविषयी शिवरामनला व लक्ष्मीला कळवलं होतं. पण त्यांनी तिच्याशी पूर्ण संबंध तोडले होते. रेखाचं असं म्हणणं होतं की, भरतची साधी चौकशीपण शिवरामन करीत नव्हते. त्यांनी भेटण्याचे प्रयत्न केले हे धादांत खोटं होतं.

तिला घर सोडून तीन वर्ष झाली होती. एव्हढ्या काळानंतर त्यांनी भरतला भेटण्यासाठी केलेली केस हा रेखाच्या दृष्टीने फक्त त्रास देण्याचा प्रकार होता. त्यांची भरतमध्ये कुठलीही भावनीक गुंतवणूक नव्हती.

तू भरतला त्यांना भेटायला देशील का? असं जेव्हा तिला विचारलं गेलं तेव्हा तिच्या डोळ्यातले अश्रू ती लपवू शकली नाही. ती म्हणाली, 'प्रभाकरनं भरतला स्वत:च्या मुलाप्रमाणे प्रेम दिलं आहे. भरतला माहीतसुद्धा नाही की त्याचे दुसरे कोणी वडील होते व त्याचं अपघाती निधन झालेलं आहे. मी त्याला काय सांगू व कसं समजावू? हा धक्का एव्हढा लहान भरत सहन करू शकेल का?'

खूप विचार केल्यानंतर रेखाच्या म्हणण्यात काही तथ्य आहे हे जाणवत होतं. एव्हढ्या लहान मुलाला हे सांगावं का की शिवरामन तुझे आजोबा आहेत आणि न सांगावं तर शिवरामन व लक्ष्मीचं काय? त्यांना त्यांच्या उतारवयात नातवाचं तोंड पहायची इच्छा असेल तर ती कोर्टानी डावलावी का? निर्णय घेणं खरंच खूप कठीण होतं. कोण खरं बोलत आहे? कोण खोटं? कुणाची चूक? कोण बरोबर? हे ठरवण्याचीसुद्धा गरज इथे नव्हती. फक्त विचार करावयाचा होता छोट्या भरतचा व त्याच्या आजीआजोबांच्या भावनांचा.

मी वाचकांना असं विचारू इच्छिते की तुम्ही न्यायाधीश असता तर तुम्ही काय केलं असतं?

तुमच्या पत्रांची मी वाट पाहीन व पुढील अंकी मी घेतलेला निर्णय तुम्हाला कळेलच

पत्रव्यवहारासाठी माझा पत्ता-
बागेश्री पारेख
८४ ए, लेडी जगमोहनदास मार्ग,
मुंबई-४००००६
email-parikhbageshri@gmail.com

प्रतिक्रिया- **Can We Ask For Anything Better?**

-Mrs. Deepashry S. Kothare.

Having missed Pratyush 2009 as I was in the US with my family, curiosity kept nagging me to experience Pratyush 2010. What a multi-splendoured visual extra-vaganza! Right from moment one, I was kept entertained with not a single moment of silent - drab void. (I'm sure this is the voice of every P. P. soul present there.) Kudos to all the little P.P. angels 'muah' to all of them... A round of applause to the angels' parents... it is indeed a big effort for their parents to slice out valuable time to educate their little darlings the P.P. way. Yumm... yumm... were the younger damsels.. a sweet bunchful of attractive 'belles' gyrating themselves to their physiques' best.

And lo! Behold! The superlative best were the senior most - atyas, kakis, maushis, ajis & punjis giving good 'jhatkas' to 'shola jo bhadke'... it left us all spell-bound.. awestruck and royally magnetized...

The 2 families at daggers drawn were a total entertainment exhibiting very well their acting skills.... they literally were 'utterly-butterly' amusing.... The 'Dons' displayed their negative super skills with ease by their thunderous voices and master gamey plans which sent a cold chill down the audiences' spines.

It was a happy scene to watch mother-daughter teams dance merrily on the same platform &.yes so was the case with the two sisters -dancing icons of our P. P. community Mayura and Anushry who within a week's time managed to sway effortlessly and very musically to the rythmic beats as desired by the choreographic qualifications...

The last always drives in the golden best a standing ovation to the innovative choreographer who envisioned such a panaromic visual treat, put in his laborious worth & years of rich experience realized it beautifully before us on that memorable eve of 5th June 2010.

Long live the P.P. spirit, enthu., pep & vigour. Certainly last but not the least, let us all together bless the 'yuva' generation with our warm mountainous support, encourage-ment, suggestions, continuous love, care & positive concern which enables them to dart splendidly ahead the 'P.P.er' way with a richer blend of modernism & tradition.

Itching already to witness Pratyush 2011. Luv U, guys! 'Bravo'!

हसरी रेखा -प्रदीप कोठारे

'क्रिकेट क्लबची' अध्यक्षपदासाठी निवडणूक



# YUVA MANCH
**Together Towards Tomorrow**

## ।। श्री स्वामी समर्थ-नामस्मरण सोहळा।।

**-गजेंद्र चंद्रसेन गोरक्षकर**

श्री अक्कलकोट स्वामी समर्थांची जयंती व पुण्यतिथी चैत्र महिन्यात असल्यामुळे श्री स्वामी समर्थांच्या मठात वेगवेगळे उत्सव पार पडतात. ठाकूरद्वारच्या मठात अखंड नामस्मरण तर दादरच्या मठात अखंड नामस्मरण व अकरा दिवसाचे गुरुलीलामृतांचे पारायण असते. दादरच्या मठात भजन दर गुरुवारी रात्री दोन तास, तर शनिवारी संपूर्ण रात्र चालू असते. हा क्रम १९१०ते २०१० (म्हणजे शंभर वर्षानंतर) आजही चालू आहे. बऱ्याच भाविकांना ह्या समर्थांच्या भजनातून व नामस्मरणातून प्रचिती व अनुभव येतात.

असेच माझे बंधू श्री अभिजीत सुरेश विजयकर हे दादरच्या मठात दर गुरुवारी व शनिवारी भजनाला हजर असायचे. पण वेळे अभावी दादरला भजनाला हजर राहता येत नसल्यामुळे ते आपल्या नवी मुंबईतील निवासस्थानी दर गुरुवारी स्वामींचे भजन गात असतात. असेच एका गुरुवारी त्यांना स्वामींच्या भजनातून वर्षभर अकरा नामस्मरण करण्याचे संकेत येऊ लागले. पहिल्यांदा हा एक भास किंवा स्वप्न आहे असे वाटले. पण हेच संकेत त्रिवार येऊ लागले.ही गोष्ट प्रथम त्यांनी आमच्या घरात सांगितली. कारण पूर्वी माझ्या पारल्यातील निवासस्थानी दरवर्षी मे महिन्यात चोवीस तासाचे नामस्मरण मोठ्या उत्साहात पार पडायचे. हे संकेत होते की संकल्पना, हे माहीत नाही. पण आमच्या घरातील सर्वजण स्वामीभक्त असल्यामुळे हे नामस्मरण करण्याचे आम्ही ठरवले व पहिल्याच नामस्मरणाला अकरा भाविकांनी आपली नावे पुढील महिन्यातील नामस्मरणाकरिता जाहीर केली.

पहिले नामस्मरण अक्षय तृतीया ह्या दिवशी सौ. पूजा सुरेंद्र केसवानी (कु. शुभांगी गजेंद्र गोरक्षकर) ह्यांच्या निवासस्थानी (दहिसर-पूर्व) येथे करण्यात आले. २००८ साली अक्षय तृतीयेच्या दिवशी सौ. पूजा ह्यांच्या घरी श्री स्वामी समर्थांची ५ x ३ फूटाची मोठी तसबीर लावण्यात आली. २००९ मध्ये ह्या तसबीरीला एक वर्ष पूर्ण झाले म्हणून तो दिवस साधून त्यांच्याकडे नामस्मरण व भजनाची सुरूवात केली. कल्पना अशी होती की ज्या भाविकांना नामस्मरण, भजन करायचे असेल त्यांनी श्री स्वामी समर्थांचा फोटो, मूर्ती अथवा पादुका असतील त्यांनी त्याची प्रथम सकाळी, स्वामींची मूर्ती किंवा पादुकांवर दूधाचा किंवा पंचामृती अभिषेक करावा, तुळस व वासाच्या फुलांनी महाराजांना सजवावे. नैवैद्य दाखवावा व आरती ओवाळून स्वामींचा जयजयकार करावा.

दुपारी ठीक चार वाजता नामस्मरणाची सुरुवात होते. त्याच्या अर्धा तास अगोदर म्हणजे साडेतीन वाजता स्वामींची वीणा दारात येते. ज्या भक्ताकडे दर महिन्याला पाळीपाळीने नामस्मरण असते तशी ती विणा नेण्यात येते. वीणा दारात आल्यावर ज्यांनी वीणा धरलेली असते त्या भक्ताचे पाय धुणे, वीणेला व त्या भक्ताला हळदकुंकू लावणे, अक्षदा वाहणे व तेलाच्या आरतीने ओवाळणे, व वीणा स्वामींच्यापुढे ठेवणे. चार वाजता स्वामींना अभीर, हळद, कुंकू व अक्षदा वाहून पुरुषांनी वीणेला अभीर तर स्त्रियांनी हळद, कुंकू वीणेला हार घालून प्रथम स्वामींच्या जयजयकारानंतर 'श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ' ह्या झांझा, टाळांच्या व टाळ्यांच्या गजरात नामस्मरणाला सुरुवात होते. नामस्मरणाची सुरुवात मुख्य अतिथी नंतर घरातील मंडळी व नंतर सर्व भाविकांना पाळीपाळीने वीणा धरण्याची संधी मिळते. नामस्मरण चालू असताना वीणा खाली ठेवायची नसते. अडीच तासाच्या नामस्मरणानंतर समाप्ती होते व घरातील प्रमुख यजमानांनाकडून स्वामीना आरती ओवाळली जाते. आरती झाल्यावर भजन व नंतर पेढे, खडीसाखर व शेंगदाण्याचा प्रसाद वाटून सर्व उपस्थिताना नाश्ता दिला जातो. वर्षभरातील ही सर्व नामस्मरणे मोठ्या उत्साहात व प्रसन्न वातावरणात पार पडली.

एप्रिल २००९ ते मार्च २०१० ह्या बारा महिन्याच्या कालावधीत खालील भाविकांकडे नामस्मरण करण्याचा योग आला. सौ. पूजा सुरेंद्र केसवानी (दहीसर-पू), सौ. प्रांजली राजेश धुरंधर (विरार, प.), सौ. ज्योती भरत विजयकर (विरार, पू.), सौ. सैना (शलाका) मल्लेश भद्रनावर (लोखंडवाला, अंधेरी), सौ. उज्वला नरेश कीर्तिकर (बोरिवली,प.), सौ. पवार (दहिसर, प.), सौ. मनिषा रुपेश राऊत (दहिसर,पश्चिम), सौ. शुभांगी हेमचंद्र प्रधान (लोखंडवाला, अंधेरी), सौ. अंकिता अणवेकर (आंबोली, अंधेरी), सौ. भक्ती मोहनीश शेट्ये (मुलुंड, प.), श्री. अभिजीत सुरेश विजयकर (अंधेरी, प.), सौ. जान्हवी रितेश कीर्तिकर (बोरिवली, प.) व श्री पांडुरंग रघुवीर कोठारे (मालाड, प.).

ज्या भाविकांनी ह्या नामस्मरण व भजनाचा लाभ घेतला त्या प्रत्येकाला स्वामींची प्रचिती व अनुभव आलेले आहेत. बऱ्याच भाविकांना आपल्या घरी नामस्मरण करण्याची इच्छा असते; पण जागा व वेळेअभावी ते शक्य होत नाही, अशा ह्या भाविकांकडून वर्षभराच्या नामस्मरणात करण्यात आले. असो.

पुढील नामस्मरणात जास्तीत जास्त भाविकांनी ह्याचा लाभ घ्यावा ही श्री अक्कलकोट स्वामी समर्थ चरणी प्रार्थना.

।श्री स्वामी समर्थ जय जय
स्वामी समर्थ।।

❑

## Pratyush 2010 – An Onlooker's view!

-Akshay Sudeep Kothare

I'd heard Mayura (Gunjarav Nayak) describe passionately about the practices, the arrangements, the obstacles, the successes with regard to Pratyush 2009. I was really amazed at what she along with the entire Yuva Manch and Prabhu Tarun team had been able to accomplish. This year, I got to see first hand all the stuff that goes on behind the scenes of making such an event. The moment, we'd decided to visit India in May, my wife Anushry and Mayura (her sister) were very keen that she should in some way take part in Pratyush 2010. While, I was all for Anu taking part in the event, I was really very skeptical how she'd be able to find time for the rigorous practices and balance our social commitments.

It all started the second day after we'd landed. We reached Tilak Mandir (the venue for all the dance practices) and waited impatiently for Vishwas Sir to show up. Meanwhile, his assistants, Aniket and Shraddha were putting all the other participants through their routines. Vishwas Sir did come at last and began taking these participants to task. Apparently, quite a few hadn't been able to make it for a practice session the previous day and he was visibly irritated with it. Not much came off from our introductory meeting with Vishwas Sir, as he was busy straightening the steps of folks in some of the other dances. I remained skeptical, but somehow Anu had a lot of patience and confidence that she'd be able to take part in some way.

A couple of weeks passed, and still there was no sign of Anu getting her chance. We visited Tilak Mandir one of those evenings. I was really impressed with Deepak (Suhas Kothare) and Gunjarav (Vihang Nayak) then. I'm sure there are/were many others behind the scenes, but either I don't know them or didn't see them there at the time. These folks after their regular hectic work day were present at Tilak Mandir, discussing about the auditorium bookings, ticketing, finances, arrangements and other stuff. It's probably very easy for us to sit back and be arm-chair critics of someone else's work. But, I must admit, it does take a lot of passion to really volunteer your time, effort and energy for such a community event, which can really be a highly stressful thankless unpaid job. I've witnessed Deepak and Sanjana (Deepak Kothare) celebrate their Wedding Anniversary as well as their daughter's birthday at these practices for Pratyush 2010. For those of us who tend to be critical of the work done by volunteers at Prabhu Tarun or from the Yuva Manch team, I'd only say this: If you think, you can make a positive difference, rather than making comments and criticisms, pls. come forth and offer your help/services to these guys. They'd really welcome help in any which way. There's so many aspects (in the forefront: being

(Cont on page 5, col 4...)

WAKA WAKA... It is time for ग्राहका!
तरीही, हे ग्राहका तुम्ही फक्त WAKA वाका'
It is time for ग्राहका!

भाववाढ झाली तरी तुम्ही ओरडू नका
दूध महागले, गॅसही महागला
फळे भाज्याही कडाडल्या, कांद्याने आणले आसू
तरीही, हे ग्राहका तुम्ही फक्त WAKA वाका
It is time for ग्राहका!

पेट्रोल, डीझेल, सीएनजीचे दरही वाढले,
म्हणून रिक्षा, टॅक्सीचे भाडे ही वाढवले
तरीही, हे ग्राहका तुम्ही फक्त WAKA वाका
It is time for ग्राहका!

नाही येणार हे भाव आता खाली, कुणीही नाही आपला वाली
आजचे विरोधक करतील फक्त बकबक, पुढल्या निवडणुकीसाठी हे सारे नाटक
तरीही, हे ग्राहका तुम्ही फक्त WAKA वाका
It is time for ग्राहका!

आपला देश जरी नसेल खेळत फुटबॉल, आपण बनलो आहोत फुटबॉल
खेळ मांडला आहे ह्या राजकीय खेळाडूंनी
ज्या सोकारचे फक्त तेच एकमेव विजेते (बिनविरोध)
तरीही, हे ग्राहका तुम्ही फक्त WAKA वाका
It is time for ग्राहका!

**-चारुदत्त धैर्यवान**

शिदोरी

# ‘पिलांना अजून पंख फुटायचेत’

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर

आधी शाळेत, नंतर कॉलेजमध्ये डिग्रीपर्यंत शिकून शिक्षण पूर्ण होते. या काळात इयत्ता पहिलीपासून ते मॅट्रिकपर्यंत सलग एकाच शाळेत शिकलेल्या व्यक्ती जेव्हा भेटतात तेव्हा मला फार गंमत वाटते. कारण माझी मोठी बहीण मृदुला आणि मी वेगवेगळ्या कारणांनी किमान नऊ शाळांतून फिरलो तेव्हा मॅट्रिक झालो! याला मुख्य कारण म्हणजे सरकारी नोकरीत वडिलांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या. मृदुला सातवीत आणि मी पाचवीत ज्या वर्षी गेलो तेव्हा वडील कोयना धरणाच्या बांधकामावर हेळवाकला नेमले गेले. एक तर तिथे शाळाच नव्हती. शिवाय पुन्हा बदली कुठे आणि केव्हा याचा काहीच नेम नव्हता. शिक्षणाचे हाल नकोत म्हणून आईवडिलांनी आम्हाला दूर पुण्याला नावाजलेल्या हुजूरपागेत पाठवायचे ठरवले. महत्त्वाचे म्हणजे पेशव्यांच्या त्या प्रशस्त आवारामध्ये शाळेला जोडूनच बोर्डिंग होते. म्हणजे नवीन शहरात मुलींना उगीच फिरायला लागणार नाही, हा पालकांना केवढातरी मोठ्ठा दिलासा होता.

हुजूरपागेच्या बोर्डिंगमध्ये वेगवेगळ्या शहरातून आलेल्या इयत्ता ५ वी ते ११ वी पर्यंतच्या मुली असायच्या. फक्त दोनच मुली इयत्ता ४थीत होत्या. एकीच्या दोन मोठ्या बहिमी ९वी आणि ११वीत तिथेच होत्या म्हणून आणि दुसरीचे डोंबिवलीचे आईवडिल नोकरीमुळे जमशेदपूरला गेले म्हणून ही एक्सेप्शनल सवलत होती. डोंबिवलीची मुलगी जरा काही झाले की मोठ्याने भोकांड पसरून रडायची आणि मग बोर्डिंगमधल्या मोठ्या मुली तिची समजूत घालायच्या.

तसे पाहिले तर एकंदरीतच बोर्डिंगमधल्या ७वी, ८वी पासून पुढच्या मुलींना आपण वडीलधाऱ्या आहोत असे वाटायचे. लहान मुलींना अभ्यासात मदत करणे, वेळ पडेल किंवा लहर लागेल त्याप्रमाणे दम देणे, आपण स्वत: भसाड्या आवाजात गाणी म्हणणे आणि छोट्या पोरींना त्यावर नाचायला लावणे असले प्रकार चालायचे आणि या तिथल्या रीतीभाती मान्य करण्यावाचून बहुतेकींना गत्यंतरदेखील नसायचे.

बोर्डिंगमधल्या बहुतेक खोल्यांमधून दोन किंवा तीन मुलींची सोय केलेली असायची. फक्त सेंटरला एक मोठा हॉल होता तिथे बारा मुली रहायच्या. म्हणजे दोन किंवा तीन सख्ख्या बहिणी असतील तर किंवा चुलत-मावस बहिणी असतील तर त्या हॉलमध्ये राहत असत. मृदुला आणि मी हॉलमध्येच होतो. नेमक्या त्याच वेळी मोठी बहीण ७वीत आणि धाकटी ५वीत अशा दाणी, तळवळकर आणि रानडे आडनावाच्या बहिणीसुद्धा त्या हॉलमध्ये होत्या. या सर्व सातवीमधल्या बहिणी पाचवीतल्यांना सतत धाकात ठेवायच्या, ओरडायच्या, चापट्या मारायच्या, कधी कधी तर उड्या मारायची दोरी घेऊन त्याने चाबकासारखं मारायच्या. मृदुलाने असले प्रकार कधीच केले नाहीत. शाळेची वेळ सोडली तर उरलेला सारा वेळ मी ग्राऊंडवर खेळत असे. त्यामुळे माझी अभ्यासाची पुस्तकं, कपडे, अंथरूण वगैरे सर्व तीच आवरून ठेवत असे. (मला त्याची शरमही नव्हती) एवढेच नव्हे तर सकाळी ७ वाजता बोर्डिंगच्या मुलींसाठी घंटा वाजायची तेव्हा तळमजल्यावर मेसमध्ये जाऊन ग्लासभर गरम दूध आणि शिरा, उपमा, पोहे यापैकी काही नाश्ता असे तो प्रत्येकीला वाढून दिला जायचा. मात्र संपल्यावर दुसऱ्यांदा देत नसत. ‘तुझ्या वाटचं तुला दिलं, संपलं’ म्हणायच्या. बहुतेक वेळा मृदुलाच्या ‘वाटचं’ ती स्वत: न खाता मला देत असे. या सर्व गोष्टींचा हॉलमधल्या सातवीवाल्या बहिणींना प्रचंड संताप येत असे. ‘ही मृदुला फार बावळट आहे, तिला धाकटी बहीण कंट्रोल करता येत नाही, तिला शिकवायला पाहिजे.’ अशी त्यांची पिटपीट चालायची. एकदा सुटीच्या दिवशी हॉलमधल्या सर्व मुली तिथेच असताना मी मृदुलाला काहीतरी उलटे बोलले. ती गप्प राहिली. पण सातवीवाल्या सर्व बहिणी लगेच उसळल्या. ‘काय हे मृदुला? ऐकून कसं घेतेस तू? चांगलं सरळ केलं पाहिजेस तिला-तुला जमत नसेल तर आम्ही शिकवतो-’ असं म्हणत त्यांनी मृदुलाला घेरलं. एकीने दप्तरातून फूटपट्टी काढून आणली. ‘ही घे आणि चांगली फटकाव तिला म्हणजे पुन्हा उलट बोलणार नाही बघ’ अशी शिकवण सुरू झाली. इकडे मृदुला जागच्या जागी थिजल्यासारखी उभी-मी पाहत होते आता ही काय करते? त्या सगळ्यांची कलकल कमी झाल्यावर ती एवढंच बोलली, ‘माझी धाकटी बहीण आहे ती. मी नाही तिला मारणार!’

झालं! सगळ्या ७वीवाल्यांची हवा फुस्स् झाली! ‘हिच्या नादी लागू नका, काही फरक पडणार नाही तिच्या टाळक्यात’ अशी बडबड करत त्या आपल्या धाकट्या बहिणींना सुधारायला गेल्या.

इतकी वर्षं होऊनसुद्धा मृदुलाचे ते शब्द मला जसेच्या तसे आठवतात. पण बोर्डिंगमधल्या तेव्हाच्या सर्व मुलींना मात्र माझी आठवण वेगळ्याच कारणाने येत असली पाहिजे!

सकाळी आंघोळी करण्यासाठी पंधरावीस न्हाणीघरे बांधलेली होती. लहानमोठ्या सर्व मुली नंबर लावून तिथे आंघोळी करायच्या. एकदा मृदुला आंघोळीला गेली, त्यानंतर अर्ध्या तासाने मी निघाले. मला माझा टॉवेल सापडेना. बाथरूमजवळ पोचले तेव्हा आंघोळ करून इतर मुलींशी बोलत समोरून मृदुला येत होती आणि तिच्या हातात माझा टॉवेल. काही विचार न करता मी फाडकन् तिच्या डाव्या गालावर थप्पड मारली. त्याबरोबर तिची वरची दाढ तुटून फटकन् खाली पडली. सर्व मुलींमध्ये पळापळ, संपूर्ण बोर्डिंगमध्ये आणि शाळेमध्ये त्यादिवशी ‘ब्रेकिंग न्यूज’ हीच की मृदुलाच्या धाकट्या बहिणीने थोबाडीत मारून तिचा दात पाडला- प्रकरण गंभीर असल्याने शाळेच्या प्रिन्सिपॉल आणि बोर्डिंगच्या रेक्टर यांनी आम्हाला दोघांना ‘समन्स’ पाठवले. मृदुलाला विचारले, थोबाडीत मारल्यामुळे तुझा दात पडला हे खरे आहे काय?’ मृदुला म्हणाली, ‘टीचर, खूप दिवसांपासून तो दात खूप हलत होता, पडणारच होता. माझ्या धाकट्या बहिणीला तुम्ही शिक्षा नका करू-’ नाईलाज झाल्यामुळे त्या दोघींनी मला ‘पुन्हा असे होता कामा नये’ अशी फक्त वॉर्निंग दिली. मात्र हॉलमधल्या ७वीतल्या सर्व बहिणी तेव्हापासून मला वचकून राहू लागल्या ५वीतल्या बहिणीनी मला फक्त डोक्यावर घेऊन नाचायचे बाकी ठेवले.

आयुष्यात पहिल्यांदा घरापासून, आईवडिलांपासून दूर राहाण्याच्या या आठवणी आहेत. त्याचबरोबर लहान वयातदेखील घराचे, भावंडाचे छत्र आपल्यावर कशी सावली धरून असते याच्यादेखील! ❏

(Cont from page 4, col 4...)

participants in the skit / dances; in the background: helping with arrangements, ticketing, donations, planning) behind presenting such an event, I'm sure there is some area where we can make a difference.

On Friday May 28th, Mayura / Janhavi (Ritesh Kirtikar) called up Anu saying that 'Ban than Chali' was being choreographed and that she'd be one of the girls. Since that day and to-date, I've heard nothing but either 'ban than chali' or about 'ban than chali' at home. In five days, the dance was setup and Anu felt like it were old days again. She'd finally be performing on-stage after a long gap for a 'jaticha' function. Having seen Vishwas Sir (as he's fondly called by all) and his assistants, go after these participants, there was a quiet confidence that things should turn out well. Vishwas Sir is quite a task master when things aren't going right and knows just the right knobs to turn to get the best out of his dancers. I mean, this is a guy, who worked with people across all age groups. He made our aunties and if I may take the liberty of saying it 'golden oldies' dance to 'Shola Jo Bhadke' or had all the GenNext kids dance to 'Prem Ki Naiyya'. Hats off to him in making non-dancers groove and the dancers look like super-stars!!!

Pratyush 2010 was held on June 5th. For those of you who saw it live, I'm sure you will agree that it was a FABULOUS SHOW. For those of you, who couldn't make it, well, you missed something special. Hopefully, you can relive some of the moments, if you can lay your hands on the DVD from some members of the families of VIJAY JAYKAR or JAY VIJAYAKAR or the bumbling don FUR CAP or some of the participants in the other dance sequences. Yes, it was a very nicely scripted program, which kept us enthused and engrossed for the entire duration of the show. While watching the senior citizens either emote or dance gave us a sense of pride at their achievement and a sense of admiration at their skills, seeing the GenNext kids go about their thing, gave us hope and confidence of a brighter tomorrow!!!

Last, but not the least, I think, the entire team of Prabhu Tarun, Yuva Manch deserve our STANDING OVATION and A LOUD APPLAUSE for successfully presenting Pratyush 2010. Here's wishing them all the success in their future endeavors. Looking forward to the next edition of Pratyush.

# हौशीकला मंदीर संस्थेच्या कॅरम स्पर्धा-२०१० वर्ष तिसरे

हौशीकला मंदिर संस्थेतर्फे, रविवार दि. १३ जून, २०१० रोजी पाठारे प्रभु सोसायटीच्या हॉलमध्ये कॅरमच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेला आबालवृद्धांकडून भरपूर प्रतिसाद मिळाला. शनिवारी श्रीमती सरोज प्रधान आणि सौ. योगिता नवलकर यांच्या हस्ते स्पर्धेचे ड्रॉ काढण्यात आले.

सौ. शुभांगिनी जयकर यांनी प्रास्ताविकाचे भाषण केले. श्री. सुजीत कीर्तिकर यांनी प्रथम कॅरम बोर्डवर स्ट्राईक करून स्पर्धेचे उद्घाटन केले आणि पहिली स्पर्धा ज्ञातीतील ज्येष्ठ नागरिकांमध्ये खेळली गेली.

संस्थेतर्फे सकाळी सर्व उपस्थितांना इडली, वडा, समोसा आणि चहा कॉफीचा नास्ता देण्यात आला.

ह्या कॅरम स्पर्धेत एकूण ४१ स्पर्धकांनी भाग घेतला होता.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे आहे

१) मिक्स डबल्स- विजेते-श्री. सतीश कोठारे + श्रुती कोठारे

उपविजेते-श्री. रश्मीन राणे+सौ. श्वेता भू. राणे

२) महिला डबल्स- विजेत्या- सौ.योगिता नवलकर + सौ. ऐश्वर्या तळपदे

उपविजेत्या-दिपाली कोठारे + कु. निहारीका तळपदे

३) पुरुष डबल्स-

विजेते- श्री. रश्मीन राणे +भूषण राणे

उपविजेते- श्री. राकेश धैर्यवान + श्री. रुपेश धैर्यवान

४) महिला (एकेरी)- विजेत्या-सौ. योगिता नवलकर , उपविजेत्या-कु. निहारिका तळपदे

५) पुरुष एकेरी- विजेता-श्री. सतीश कोठारे

उपविजेता-श्री. परेश कोठारे

दुपारी श्री. सुजीत य. कीर्तिकर यांच्यातर्फे दिलेल्या चिकन कटलेट आणि स्वादिष्ट मटण बिर्यानीचा सर्व उपस्थितांनी आस्वाद घेतला. तसेच संध्याकाळी श्री. सुधीर धुरंधर आणि प्रिया धुरंधर यांनी वेफर्स आणि कैरीचे पन्हे दिले.

खालील मान्यवरांनी देणग्या देऊन संस्थेच्या ह्या उपक्रमाला आशीर्वाद दिले.

१) कु. मिनल प्रधान-रु. ५०००/-

२) श्री. राजन ग. विजयकरकडून त्यांच्या मातोश्री सुधा ग. विजयकर यांच्या स्मरणार्थ रु. २०००/-

३) श्री. पुष्पसेन तळपदे रु. २०००/-

४) श्रीमती सरोज ज. प्रधान रु. १००१/-

५) सौ. व श्री. किरण सी. नवलकर रु. १००१/-

६) श्री. निखिल एस. तळपदे रु. १००१/-

७) सौ. निलन व श्री. दिपक धैर्यवान रु.१००१/-

८) श्रीमती लीला ग. राणे रु. ५०१/-

९) सौ. व श्री. पांडुरंग कोठारे ५०१/-

१०) श्री. ज्योतिंद्र अजिंक्य रु. ५०१/-

श्रीमती लीला ग. राणे यांनी ज्येष्ठ स्पर्धकाला आणि सर्वात लहान स्पर्धकाला व्यक्तिश: बक्षिसे दिली.

श्री. अतुल जयकर यांनी सामन्याच्या पंचाचे आभार मानले. ज्यांच्या पुढाकाराने आणि अथक परिश्रमाने ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडली त्या श्री. रोहिल ज्ञा. जयकर, श्री. विनय तळपदे, श्री. सुधीर धुरंधर, श्री. अजित जयकर आणि श्री. प्रकाश बा. नायक यांचे आभार मानले. तसेच पाठारे प्रभु सोसायटीचे, स्पर्धकांचे, देणगीदारांचे व सर्व प्रेक्षकांचे आभार मानून स्पर्धेची सांगता केली.

## प्रभुतरुणास देणगी

❀ सौ. शीला आणि श्री. मधुकर कोठारे यांजकडून त्यांचा नातू 'ओरियन' (सौ. जॅक आणि श्री. अमित मधुकर कोठारे यांचा प्रथम पुत्र) ह्याच्या जन्माप्रीत्यर्थ रु. १००१/-

❀ श्रीमती रजनी विनोद तळपदे यांजकडून त्यांचा भाऊ श्री. शशीकांत विनायक कोठारे यांच्या स्मरणार्थ (निधन २३-३-१०) रु. ५००/-

❀ श्वेता मनोहर धुरंधर हिच्या स्मरणार्थ तिची आई सौ. कविता मनोहर धुरंधर यांजकडून रु. १०१/-

## परीक्षेतील सुयश

**शालांत परीक्षा (दहावी)**

श्री. प्रथमेश राजेश धुरंधर ९२ टक्के

कु. केया सचिन विजयकर ९० टक्के

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी)**

कु. शलाका नीलेश मोहन विजयकर ४४८/६००, ७४.६७ टक्के

कु. ख्याती तेज वेलकर, ७८ टक्के

## पाठारे प्रभु महिला समाज

महिला समाजाच्या गतांकी प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमातील मजकूरात पुढील कार्यक्रमही असेल याची नोंद घेण्याची सूचना समाजचिटणीसांनी केली आहे-

सात ऑगस्ट रोजी होणाऱ्या सभेनंतर स्पर्धेबरोबरच सौ. विद्या रानडे यांचा 'ओंकाराचे महत्त्व' या विषयावर कार्यक्रम होईल.

महिला समाजाचा वार्षिक अहवाल सालाबादप्रमाणे घरपोच आला. वर्षभर केलेल्या भरगच्च कार्यक्रमाचा आणि हिशोबाचा तक्ता असणाऱ्या या अहवालाचे स्वागत

## प्रतिक्रिया

रंगशारदा येथे दि, ५ जून २०१० रोजी प्रत्युश २०१० कार्यक्रमातील नाटक, नृत्याचा झालेला आगळा वेगळा व नाविन्यपूर्ण असा आविष्कार अतिशय मनोरंजनात्मक आणि मनाला भावणारा वाटला. ह्या आठवणी मनात ठेवून आम्ही प्रत्युश २०११ची चातकाप्रमाणे वाट बघतो आहोत. Our Best Wishes for next year!

**-पुष्पल विजयकर**

## अभिनंदन

❀ निवडलेल्या अंतीम चारजणांतून सौ. सुषमा उदय कीर्तिकर यांना इंडिया यू.एस.एम. चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे 'बेस्ट कम्युनिटी सर्विस ॲवार्ड' प्राप्त झाले. कान्सुल जनरल ऑफ इंडियाच्या श्री. संजीव अरोरा यांच्या हस्ते ते देण्यात आले.

सौ. सुषमा यांनी आशियाई स्त्रियांसाठी 'पहचान' ही संस्था स्थापन केली आहे. अभिनंदन.

❀ 'ईटीव्ही' वरील 'वॉव' या कार्यक्रमात शिल्पा नवलकर या गुणी अभिनेत्रीचा सहभाग होता. त्या या कार्यक्रमात विजेत्या ठरल्या.आदेश बांदेकरांशी झालेल्या संवादात त्यांनी अस्सल मुंबईकर असलेल्या स्वत:च्या पाठारे प्रभू ज्ञातीचा अभिमानाने उल्लेख केला. 'ईटीव्ही'वरील त्या पहिल्या नायिका होत; हेही त्यांनी आवर्जून सांगीतले. अभिनंदन.

❀ कु. पायल प्रदीप राणे यांनी मुंबई विद्यापीठाची 'स्टडीज ऑन रिलेशनशीप बिटवीन प्लॅण्टस् अँड नॉईज' या विषयावर बॉटनीमधील पी.एचडी पदवी प्राप्त केली. अभिनंदन.

## प्रतिक्रिया

The Editor,
Prabhu Tarun,

I attended Prabhu Tarun Yuva Manch's `Pratyush-2010', on Saturday June 5, held at Rangsharada. I belong to the generatation of Prabhu Tarun where we had organised `Padgham' on similar lines under the guidance of Vihangmama (late Shri Vihang Nayak). It revived the memories of yesteryears once again by attending Pratyush-2010.

Firstly, I thank the Prabhu Tarun Board for always believing and building confidence in the younger generation. Prabhu Tarun always gives a platform to `Generation Next' by publishing their articles in their monthly magazine, organising a fun-filled programme like Pratyush etc. Prabhu Tarun always gives the guidance and support whenever neccessary. This approach enables the young artists in giving the audience a flewless `Pratyush' with a dash of professionalism. The most amazing point I would like to mention for those who could not make it to Pratyush 2010 was that it brought out the inner talent from a three year old infant upto a seventy year old granny. I have been in touch with some of the organisers and participants and have closely known the hurdles they have faced in putting up the show but without any complaints they overcame them and proved once again.

`WHERE THERE IS A WILL THERS IE A WAY'

Last but not the least I would invite others to join in and make it a repeated success for years to come

-**Supriya Rohit Shah**
(nee Supriya Sudhakar Kothare)

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

२०-६-१० अर्जुन अनिकेत तळपदे

### कुर्यात् बटोर्मंगलम्

१८-५-१० पराग मिलींद धराधर

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| १५-५-१० | श्री. आदित्य राजन राणे | कु. ज्योती गोविंद कापरी (आंतर्ज्ञातीय) |
| २८-५-१० | श्री. सचिन शेखर राणे | कु. जयश्री दुदामभाई राठोड (आंतर्ज्ञातीय) |

### विवाह सुवर्णमहोत्सव

१५-५-१० श्री. मेनिकांत बाबुलनाथ नवलकर सौ. माया (कु. प्रभावती विश्वनाथ त्रिलोकेकर)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १२-५-१० | श्री. शामसुंदर रामदत्त राणे, | वय ७७ | सांताक्रूझ |
| १४-५-१० | श्री. पुष्पसेन खंडेराव तळपदे | वय ८३, | दादर |
| १८-५-१० | श्री. लक्ष्मीकांत गणपतराव जयकर | वय ९०, | खार |
| ३१-५-१० | सौ. रंजना रजनीकांत नवलकर | वय ६६, | विलेपार्ले |
| ०१-६-१० | कु. संगीता सुधाकर जयकर | वय ५०, | जोगेश्वरी |
| ०६-६-१० | श्रीमती हिराबाई खंडेराव देसाई | वय ८९ | बोरीवली |
| १५-६-१० | श्रीमती शीला श्रीकांत रणजीत | | ठाकुरद्वार |
| २४-६-१० | श्रीमती उषा रसिक व्यवहारकर | वय ७५, | प्रभादेवी |
| २७-६-१० | श्रीमती सुभद्रा शंकर आनंदकर | वय ८४, | ठाणे |
| ६-७-१० | श्रीमती मोहिनी (सुशीला)मनोहर तळपदे | वय ८८, | खार |

## प्रभुसेमिनरीशाळा

यावर्षी शालांत परीक्षेचा निकाल ८५.७१ टक्के लागला. शाळेच्या वेळाव्यतिरिक्त या शाळेतील शिक्षकांनी अधिकचे दोन तास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उन्हाळी सुट्टीतही शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी वर्ग घेतले. याचे फलित शाळेच्या निकालात दृश्य रूपात प्रतिबिंबीत झाले. अभिनंदन.

## चुकीची दुरुस्ती

❀ गतांकी 'मरण' या सदरात श्री. रणविहारी कुंजविहारी तळपदे असे वाचावे.

❀ 'नांदा सौख्यभरे' या सदरात श्री. श्रेयस देसाई आणि कु. निकीता राणे याचा विवाहदिन २२-५-१० असा वाचावा.

❀ 'प्रत्युश १०'मध्ये छोट्या कलाकारांच्या नृत्यात श्रद्धा दीपक धराधर या चिमुरडीचा सहभाग होता. नामफलकात तिचे नाव झळकले नाही. श्रद्धा, खूप खूप 'सॉरी' बरं का.

❀ गतांकी पान ५ वरील पूर्ण पानभरून असलेली प्रतिक्रिया एकूण आठ नृत्यात सहभागी असलेल्या वीरधवल तळपदेची आहे. त्या लेखाचे शीर्षक त्यांचेच आहे.

*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.

Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.

Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA'' Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400 053.
Tel. : 2630 3902 / 2630 3906 Mobile : 9821447675
Booking Mobile : 09823884094 / 09422543614

// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**



*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८